<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. २</u> **<u>नि.फौ.ख.क्र.२०१/२०२३</u>**

सरकार विरूध्द सचीन व एक

मी शपथपूर्वक खरे सांगतो की **निशाणी – ३७**

माझे नाव – प्रशांत वामनराव कापसे
वय – अंदाजे ३६ वर्ष, व्यवसाय – नोकरी
राहणार – महादुला, कोराडी, नागपूर.

सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लुले यांच्या कडून

दिनांक१६.०३.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा पोलीसांनी मला आर्थिक गुन्हे शाखा कार्यालय नागपूर येथे पंचनाम्याकरीता बोलविले होते. तेथे मला पोलिसांनी जो गुन्हा घडला त्याची माहिती दिली. पोलिसांनी मुख्य अभियंता कोराडी यांना पत्र पाठवून दोन कर्मचा–यांची पंच म्हणून मागणी केली होती त्याप्रमाणे मुख्य अभियंता यांनी मला पंच म्हणून काम करण्यास पाठवून दिले. मी कार्यालयात गेलो त्यावेळी पोलिसांनी मला शैलेश कोचनकर यांची ओळखू करून दिली. माझ्या सोबत दुसरे पंच मुकेश यधुवंशी हे हजर होते. पोलिसांनी शैलेश कोचनकर यांना इंग्रजी मधील नोटपॅड दिले, शैलेश याचे पोलिसांनी एका पानावर एक वेळा असे सहा पानावर इंग्रजी मध्ये हस्ताक्षर घेतले. त्यानंतर त्या हस्ताक्षर नमुन्यावर दुसरे पंच मुकेश यधुवंशी व आरोपी यांनी व पोलिसांनी हस्ताक्षर केले. मला आता ते हस्ताक्षराचे सहा नमुने दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावरील सहया मी ओळखतो. त्यावर माझी, दुसरे पंच मुकेश यधुवंशी, आरोपी व पोलिसांच्या सहया आहेत. त्या लोकांनी माझ्या समक्ष सहया केल्या आहेत. त्यातील मजकूर आरोपींनी माझ्या समक्ष लिहीला आहे. त्या नमुन्यांना **<u>अनु क्र. निशाणी ३८ ते ४३</u>** देण्यात येते.

२. त्यानंतर आरोपी शैलेश याची प्रत्येक पानावर सहा वेळा अश्या सहा पानावर प्रत्येकी सहा वेळा स्वाक्ष–या घेण्यात आल्या. ती सहा पाने मला आता दाखविली. ती तीच आहे. त्यावरील स्वाक्ष–या मी ओळखतो. त्यावर माझी, दुसरे पंच मुकेश यधुवंशी, आरोपी व पोलिसांच्या सहया आहेत. त्या लोकांनी माझ्या समक्ष सहया केल्या आहेत. त्यातील नमून्या स्वाक्ष–या आरोपीने माझ्या समक्ष केल्या आहे. त्या नमुन्यांना **<u>अनु क्र. निशाणी ४४ ते ४९</u>** देण्यात येते.

३. त्यानंतर पोलिसांनी आरोपी शैलेश यांना काही सांख्यीकी अक्षरे लिहीयला सांगितले. त्याप्रमाणे आरोपीने एका पानावर सहा वेळा असे सहा पानावर प्रत्येकी सहा वेळा सांख्यीकी अक्षरे लिहीले. त्यानंतर त्यावर मी, आरोपीने व दुसरे पंच मुकेश यधुवंशी, व पोलिसांनी सहया केल्या. ते कागदपत्र मला दाखविले. ते तेच आहे. त्यातील सहया मी ओळखतो. त्यावर माझी, आरोपीची, दुसरा पंच मुकेश व पोलिसांच्या सहया आहेत. आरोपीने त्या संख्या माझ्या समक्ष केल्या आहे. त्या नमुन्यांना **<u>अनु क्र. निशाणी ५० ते ५५</u>** देण्यात येते.

४. त्यानंतर पोलिसांनी हस्ताक्षर, स्वाक्षरी व सांख्यीकी अक्षर नमुना घेतल्याबाबतचा पंचनामा तयार केला. तो आता मला दाखविला, तो तोच आहे, त्यावर माझी, आरोपीची, दुसरा पंच मुकेश व पोलिसांची सही आहे. त्या सहया मी ओळखतो, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्या पंचनाम्यास **निशाणी ५६** देण्यात येते.

५. आम्ही त्याच दिवशी दुपारी आरोपी शैलेश याच्या घरी गेलो. आम्ही नारी रोड विश्राम नगर येथे आरोपीचे घरी गेले. माझ्या सोबत दुसरा पंच मुकेश, पोलिस व आरोपी होते. आरोपीने त्याचे घर आम्हाला दाखविले. तेथे आरोपीची पत्नी होती, पोलिसांनी आरोपीच्या पत्नीला आम्ही घर झडती घ्यायला आलो आहे, आमची झडती तुम्हाला घ्यायची असल्यास घेउ शकता असे सांगितले. त्यांनी शारीरीक झडती घ्यायची नसल्याचे सांगितले. त्या घराच्या आतल्या हॉलमध्ये एक कपाट होते, त्या कपाटामध्ये एक नोटपॅड, एक रजिस्टर, एक ईलेक्ट्रीक बील मिळाले. ती खोली आरोपीची होती. मला आता जुनी कव्हर नसलेली नोटबुक व एक नोटपॅड दाखविले, ते तेच आहे. त्यास अनु.क्र. **आर्टिकल–"अ" व "ब"** देण्यात येते. (एक जुनी नोटबुक व नोटपॅड हस्ताक्षर तज्ञामार्फत या न्यायालयाकडे दि.२०.०१.२०२६ रोजी या न्यायालयाकडे हिरव्या रंगाच्या बंद लखोटयातून पाठविण्यात आले. त्यामध्ये या गुन्हयातील वरील मुद्देमाल हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यात आल्यचे दिसते. सदरचे नोटबुक व नोटपॅड आर.सी.सी. नं.१९१/२०२३ मधील निशाणी १ वरील आदेशानूसार सहाय्यक अधिक्षकाकडे सुरक्षित ठेवण्यात आले होते. ते आज रोजी या प्रकरणात निशाणी १ वर आदेश करून मागविण्यात आले आहे. ते साक्षीदाराला दाखविले.)

६. मला आता प्रकरणातील पान नं.८१ वरील ईलेक्ट्रीक बिल दाखविण्यात आले. सदरचे बिल आरोपी शैलेश याच्या नावाचे असून ते आर्टिकल–अ व ब सोबत जप्त करण्यात आलेले आहे. त्या बिलावर माझी, दुसरा पंच मुकेश, पोलिस व आरोपी यांच्या सहया आहेत, त्या सहया मी ओळखतो, सदरबिलास **आर्टिकल–क** देण्यात येते. त्या बिलावर आरोपीचा विश्राम नगर नागपूर असा पत्ता लिहीला आहे. आम्ही याच पत्त्यावर गेलो होतो. त्यानंतर पोलिसांनी या जप्तीचा पंचनामा तयार केला. त्यावर मी, दुसरा पंच, आरोपी व पोलिसांनी सहया केल्या. तो पंचनामा मला दाखविला, तो तोच आहे, त्यावरील सहया मी ओळखतो, त्यावर माझी, दुस–या पंचांची, आरोपीची व पोलिसांची सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी ५७** देण्यात येते.

सरतपास संपला.

उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे वकील श्री. प्रवीण पांडे यांनी नाकारला.

उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे वकील श्री. आर. पी. दुर्गे यांच्या मार्फत सुरू

७. माझे १२ वी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी वैयक्तीक पत्र दिले नव्हते. माझ्या अभियंताने मला पत्र दिले नव्हते. मी पोलिस ठाण्यात

दुपारी ०१.०० वाजताच्या दरम्यान पोहोचलो. हे म्हणणे खरे आहे की तेथे गेल्यावर पोलिसांनी मला पंचनामा करायचा आहे, जप्ती करायची आहे व तुमची मदत हवी आहे असे सांगितले. साक्षीदार सांगतो की पोलिसांनी मला जप्ती करायची आहे असे सांगितले नाही. मी पोलिस ठाण्यातील कोणालाही ओळखत नव्हतो. मी पोलिस ठाण्यात गेलो तेव्हा मला कोणीही फोन केला नाही. पोलिसांनी माझी थेट आरोपींची भेट करून दिली. मी गेलो त्यावेळी कारवाई चालूच होती. हे म्हणणे खरे आहे की मी पोलिस ठाण्यात पोहोचलो, पोलिसांनी समजावून सांगितले व सही करा असे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी सही केली. मी रात्री ७ ते ८ वाजेच्या दरम्यान सही केली. हे म्हणणे खरे आहे की मी पोलिस ठाण्यात सही केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी मला सहया करायला सांगितल्याने मी केवळ सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी कधीही आरोपीच्या घरी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या घरी कोणतीही कागदपत्र जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझ्या समक्ष कोणतीही कागदपत्र काढून जप्त केली नाही.

८. मी या अगोदर कधीही पंच म्हणून काम केलेले नाही. पंचनाम्याची कारवाई कशी होते याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी जसे म्हटले तसे केले. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांना मदत करण्यासाठी मी सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीचे हस्ताक्षर, स्वाक्षरी व सांख्यीकी हस्ताक्षरांचे नमूने घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी आरोपीचे हस्ताक्षर, स्वाक्षरी व सांख्यीकी हस्ताक्षरांचे नमुने अगोदरच घेउन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की घेउन ठेवलेल्या नमून्यांवर पोलिसांनी मला केवळ सही करायला सांगितली. हे म्हणणे खरे नाही की घर झडती पंचनामा केल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की घर झडती पंचनामा माझ्या समक्ष केला नाही. हे म्हणणे खरे आहे की घर झडती पंचनामा पोलिस ठाण्यात येउन तयार केला. साक्षीदार सांगतो की सगळा निश्कर्ष काढून पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

९. सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उलटतपासा दरम्यान पोलिसांनी समजावून सांगितले व सही करायला सांगितल्याने मी सही केली असे उत्तर दिल्याने यामध्ये अस्पष्टता आली आहे म्हणून साक्षीदाराची फेरतपासणी घेण्याची परवानगी दयावी अशी विनंती केली. आरोपीची वकीलांनी फेरतपासणी ही पुराव्यातील कमीपणा दुर करण्यासाठी घेण्याची परवानगी देता येणार नाही, या उत्तराने कोणतीही अस्पष्टता अभिलेखावर आली नसल्याने परवानगी देउ नये असे कथन केले. साक्षीदाराने त्याला उलटतपासात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले असल्याने मा. दिल्ली उच्च न्यायालय यांच्याकडील **कॅपीटल आर्ट हाउस विरूध्द नेहा दत्ता मधील निकालाच्या परिच्छेद क्र.१४ व १५** मधील आदेशानूसार परवानगी देता येणार नाही असे कथन केले.

१०. मा. दिल्ली उच्च न्यायालय यांच्या वर नमूद केलेल्या न्यायनिर्णयामध्ये साक्षीदाराने होय किंवा नाही या स्वरूपात उत्तर दिले असल्याने व त्याने कोणतीही अस्पष्टता आली नसल्याने फेरतपास घेता येणार नाही असे घोषित केले आहे. याच न्यायनिर्णयात उत्तरात अस्पष्टता आली असल्यास त्या अस्पष्टेतेचे स्पष्टीकरण देण्यासाठी फेरतपास घेता येईल असे नमूद केले आहे. या साक्षीदाराने त्याला विचारलेला प्रश्न **"हे म्हणणे खरे आहे की मी पोलिस ठाण्यात पोहोचलो, पोलिसांनी समजावून सांगितले व सही करा असे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी सही केली. "** यामध्ये पोलिसांनी त्याला काय समझावून सांगितले या बद्दल अस्पष्टता दिसून येते. त्यामुळे त्याचे स्पष्टीकरण अभिलेखावर येणे अपेक्षित आहे. सबब त्यासाठी फेरतपासणी देणे आवश्यक आहे. सबब सरकारी वकीलांना फेरतपासणीची परवानगी देण्यात आली. आरोपीतर्फे फेरतपासणी नंतर त्यांना आवश्यकता वाटल्यास त्यांना उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात येते.

सरकारी वकीलांतर्फे साक्षीदाराची फेरतपासणी सुरू

११. पोलिसांनी मला बँकेत फ्रॉड झाला आहे, आम्ही पंचनामा करणार आहोत, तुमची पंच म्हणून गरज आहे, असे समजावून सांगितले.

फेरतपासणी संपली.

आरोपी क्र. १ व २ तर्फे उलटतपास नाकारला.

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.18 13:57:18 +0530

कामठी
दिनांक १८/०४/२०२६

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी